शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१. श्री.संदीप प्रभाकर गायकवाड
सुप्रभा, प्लॉट नं. ८४, स्वप्ननगरी,
धरणगुत्ती रोड, ईदगाह मैदान समोर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ,जि.कोल्हापूर

<u>तक्रार अर्ज कं.२५/२०२३</u>

२. श्री.विजय जयसिंगराव खोत
प्लॉट नं.०९, कृष्णाई बंगलो,
मारूती पार्क, दिपनगर, जयसिंगपूर
जि.कोल्हापूर.

<u>तक्रार अर्ज कं.२६/२०२३</u>

३. श्री.युवराज रामचंद्र पाटील
अयोध्या, ब्राम्हणपूरी,
मु.पो.ता.शिरोळ,जि.कोल्हापूर

<u>तक्रार अर्ज कं.२७/२०२३</u>

४. श्री.महेश विठ्ठल खराडे
मंगलमुर्ती कॉलनी, राजवाडयामागे,
तासगाव, जि.सांगली

<u>तक्रार अर्ज कं.२८/२०२३</u>

तक्रार अर्जदार

५. श्रीमती शामला राजाराम महाडिक
श्रीपती, प्लॉट नं. ४७, राम लक्ष्मण नगर,
बायपास रोड, संभाजीपूर,जयसिंगपूर,
ता.शिरोळ,जि.कोल्हापूर

<u>तक्रार अर्ज कं.२९/२०२३</u>

६. श्री. प्रसाद रामचंद्र कुलकर्णी
सि.स.न.१२२७६,प्लॅट नं.२,
आयरीश अपार्टमेंट, गुलमोहर कॉलनी, सांगली

<u>तक्रार अर्ज कं.३०/२०२३</u>

७. श्रीमती पुजा प्रसाद बेळगली
विजयश्री, रघूनाथ पार्क, हरिपूर, सांगली

<u>तक्रार अर्ज कं.३१/२०२३</u>

**विरूध्द्**

१. डॉ. जे.जे.मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

वि.प.

शिवाजी विद्यापीठ
तक्रार निवारण समिती
कोल्हापूर.

२. डॉ.जे.जे.मगदूम कॉलेज ऑफ इंजि.
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**तक्रारीचे स्वरूप :**

डॉ.जे.जे.मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचे डॉ.जे.जे.मगदूम कॉलेज ऑफ इंजि. जयसिंगपूर, जि.कोल्हापूर यांचेकडील शिक्षक/शिक्षिका श्री.संदीप प्रभाकर गायकवाड, श्री.विजय जयसिंगराव खोत, श्री.युवराज रामचंद्र पाटील, श्री.महेश विठ्ठल खराडे, श्रीमती.शामला राजाराम महाडिक, श्री.कुलकर्णी प्रसाद रामचंद्र, यांनी दि.१८/०७/२०२३ रोजी तसेच श्रीमती पुजा प्रसाद बेळगली यांनी दि.३१/०७/२०२३ तक्रार निवारण समितीकडे स्वतंत्ररित्या तक्रार अर्ज दाखल केले आहेत. या सर्व तक्रार अर्जातील मजकुर, कथने, तक्रारी व त्यास अनुसरून असणारी कायद्याची तरतूद, एकसारखी असल्यामुळे या सर्व तक्रारींची सुनावणी एकत्रितरित्या घेवून त्या एकत्रित निकाल पत्राने निकाली काढण्यात येत आहेत.

वरील सर्व तक्रारदार हे अनेक वर्षापासून सदर महाविद्यालयाच्या सेवेत असून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची वेतनवाढ दि.०१ जुलै २०२२ रोजी देय होती. मात्र गेले वर्षभर महाविद्यालय प्रशासनाने ही बाब दिली नाही. आता दि.२३ जून २०२३ रोजी प्रशासनाने सन २०२२-२३ ची वेतनवाढ का रोखू नये याचा खुलासा मागणीचे पत्र दि.२५ जून २०२३ ई-मेल व्द्बारे दिले. सदर पत्रात नमूद केलेली वस्तूस्थिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्याबाबत तक्रारदार यांनी २७ जून २०२३ रोजी मुददेनिहाय खुलास महाविद्यालय प्रशासनास दिला असून वेतनवाढ देण्याबाबत विनंती केली आहे. मात्र सदर विनंतीचा कोणताही विचार महाविद्यालय प्रशासनाने केला नाही. आणि पूर्वलक्षी प्रभावाने तब्बल एक वर्षापूर्वी देय असणारी वेतनवाढ दि.०१/०७/२०२३ रोजीच्या पत्राने नाकारली आहे. सदर पत्रात संस्थेविरोधी कारवाया केल्यामुळे शिवाजी विद्यापीठ परिनियम २११ (३) (II) अन्वये वेतनवाढ रोखण्यात येत असल्याचे कळविले आहे. तक्रारदार यांनी कोणतीही संस्था विरोधी कारवाई केलेली नाही. संस्था व महाविद्यालयान प्रशासनाने तक्रारदार यांना नियमानुसार व थकीत वेतन दिले नसलेमुळे तक्रारदार यांनी याविरूध्द् शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, विभागीय तंत्रशिक्षण संचलनालय कार्यालय, पुणे, एआसीटीई या सारख्या शिखर संस्थाकडे तक्रार केली होती. ही बाब संस्था विरोधी कारवाई होत नाही. त्यामुळे अशा बेकायदेशीर कारणावरून आमची वेतनवाढ रोखण्याची केलेली कृती ही अन्यायी व अयोग्य आहे. शिवाजी विद्यापीठ परिनियम १९९ नुसार प्रतिवर्षी वेतनवाढ देणे हे महाविद्यालय प्रशासनाचे कर्तव्य आहे. परिनियम २११ (३)(II) नुसार वेतनवाढ रोखायची असेल तर त्याबाबतची प्रक्रिया ही वेतनवाढ

देय तारखेपुर्वी होणे आवश्यक आहे. मात्र अशी कोणतीही प्रक्रिया न करता तब्बल एक वर्षापुर्वीची वेतनवाढ रोखणे हे चुकीचे व अयोग्य आहे. महत्वाचे म्हणजे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची वेतनवाढ दि.०१/०७/२०२३ रोजी तक्रारदार यांना देय आहे. ही वेतनवाढ देखील महाविद्यालयाने तक्रारदार यांना दिलेली नाही. याप्रमाणे संबधित महाविद्यालयाने आपल्यावर अन्याय केलेला आहे व सातत्याने करीत आहेत. परिनियम २११ (३) (II) नुसार तक्रारदार यांची वेतनवाढ रोखण्याचे अधिकार हे प्र. प्राचार्य किंवा कॅम्पस डायरेक्टर यांना नाहीत. त्यामुळे त्यांनी केलेली ही कृती अधिकारबाहय् आहे. सबब ती रदद् होण्यास पात्र आहे. त्यामुळे प्र.प्राचार्य व कॅम्पस डायरेक्टर यांनी दि.०१/०७/२०२३ रोजीचे पत्र जा.क्र./जे.जे.एम.सीई/वेतनवाढ रोखणे/३७७//२०२२-२३ व्द्वारे तक्रारदार यांची वेतनवाढ रोखलेबाबतचे पत्र रद्द करावे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षी देय असणा-या वेतनवाढी देण्याबाबतचे आदेश संस्था व महाविद्यालय प्रशासनास द्यावेत.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

सदर प्राध्यापकांनी सन २०२२-२३ च्या वार्षिक वेतनवाढीबाबत तक्रार केली आहे. या प्राध्यापकांनी सन २०२२-२३ ची वार्षिक वेतनवाढ रोखण्यामागील कारणमीमांसा कागदपत्रांव्द्वारे प्राधिकृत करित आहोत.

**संस्थेचा अभिप्राय :**

मा.शिवाजी विद्यापीठाच्या स्टॅटयूट मधील २११ (३) मध्ये नमूद केल्यानूसार पत्रव्यवहार सोबत जोडला आहे. तसेच संस्थेने दि.२५/०१/२०२४ रोजी समितीसमोर दाखल केलेले तक्रारीबाबतचे म्हणणे खालील प्रमाणे आहे.

१. सर्व तक्रारदार हे डॉ. जे.जे. मगदूम महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करतात. अभियांत्रिकी महाविद्यालयात अध्यापनाचे काम करीत असताना त्यांना विभागप्रमुख, डीन आदी महत्वाच्या पदाच्या जबाबदा-या होत्या. या पदाचा तसेच अध्यापन व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता असणा-या काही समित्यांमध्ये असणा-या पदांचा त्यांनी राजीनामा दिला. सदर राजीनामे मागे घेण्याविषयी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी असणा-या शैक्षणिक विकासाच्या कमिटीचे राजीनामे देवू नयेत यासाठी मा. प्राचार्य व व्यवस्थापनाने वारंवार व लेखी कळवून देखील मा. व्यवस्थापनाचे कोणतेही म्हणणे ऐकून घेतले नाही. या काळात विद्यार्थ्यांना अध्यापन न करणे, काळया फिती लावणे, दानपेटी घेवून विद्यार्थ्यांना दानासाठी आवाहन करणे, महाविद्यालयाच्या गेटवर मांडव घालून आंदोलन करणे, महाविद्यालया विरोधात घोषणा

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

देत बॅनर्स घेवून गावामध्ये रॅली काढणे हे प्रकार केले. या प्रकारांमुळे पुढील तीन वर्षे मेकॅनिकल विभागाची तसेच एकूणच महाविद्यालयाची प्रवेश क्षमता घटली. याचा संस्थेच्या सर्व स्तरावर विपरित परिणाम तर झालाच व आर्थिक नुकसान ही झाले. संस्थेविरूध्द बदनामीकारक वक्तव्ये करणे आणि याचा जाहीरपणे सोशल मिडीयावरदेखील प्रचार करणे या सर्व गोष्टी देखील तक्रारदारांनी केलेल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या स्टॅटयूटमध्ये २११ (३) (२) मधील १,२,३,५ हे MISCONDUCT (गैरवर्तणूक) या प्रकारात मोडतात.

२. त्यातील (A) Explanation या सदरात नमूद केल्याप्रमाणे व्यवस्थापनाने वारंवार व लेखी कळवून देखील केलेली गैरकृत्ये ही २११ (3) (ii) (A) (a) (b) INSUBORDINATION, An act prejudicial to the proper management of the college मध्ये नमूद होतात.

what is insubordination in the workplace?

Insubordination at work is essentially an act of serious defiance against authority. In other words, it is where an employee deliberately acts in a disrespectful manner towards their employer or superiors, or even about the business as a whole.

३. त्याचप्रमाणे VIOLATION OF CODE OF CONDUCT हा मुद्दा देखील वर नमूद गैरकृत्यांना लागू होतो. संस्थेच्या HR MANUAL 3.8 (ix) मध्ये नमूद केल्याप्रमाणे

No employee shall take part in any act or movement, such as strike, incitement or any similar activity in connection with any matter pertaining to his service or to any other matter, which tends to bring the College to disrepute, nor shall he/she approach the media with his/her grievance/s.

येणेप्रमाणे महाविद्यालयाच्या HR MANUAL चा ही तक्रारदारांनी भंग केलेला आहे. तक्रारदारांनी मा. शिवाजी विद्यापीठाच्या स्टॅटयूटमध्ये २११ (3) (ii) A d) मध्ये नमूद केल्याप्रमाणे गैरवर्तन केले आहे.

४. वरील तक्रारदार शिक्षकांपैकी श्री. व्ही. जे. खोत, श्रीमती. एस. आर. महाडिक, श्री. पी.आर. कुलकर्णी, श्रीमती. पी. पी. बेलगली यांनी मा. शिवाजी विद्यापीठाच्या अटीनुसार सात वर्षांच्या आत Ph.D पूर्ण केली नाही. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या स्टॅटयूटमधील २११ (३) (II) ५ प्रमाणे हा incompetence ठरतो. या शिक्षकांनी Ph.D वेळेत पूर्ण न केल्यामुळे महाविद्यालयाचे नुकसान झाले आहे. त्यांच्या Ph.D चा कोणताही लाभ विद्यार्थ्यांना घेता आला नाही तसेच या शिक्षकांनी त्याअंतर्गत कोणतेही रिसर्च प्रोपोजलदेखील केले नाही. यामुळे महाविद्यालयाचे आर्थिक नुकसान झाले.

५. प्रवेशितेसाठी देखील कोणतेही भरीव काम तक्रारदाराकडून न झाल्याने प्रवेशिता घटलेली आहे. याचे मूळ या तक्रारदारांनी कोणतेही प्रयत्न महाविद्यालयाची प्रवेशितेसाठी न करता केवळ तक्रारी करण्यात केलेले आहेत.

६. महाविद्यालयाच्या तक्रारदार शिक्षक सोडून इतर सर्व शिक्षकांनी आपल्या सर्व तक्रारी मागे घेतल्या. त्यांची कोणतीही तक्रार शिल्लक राहिली नाही. वेतनाबाबत तक्रार नाही इतर शिक्षक वर्ग वर नमूद गैरवर्तणुकीतून बाजूला झाला आणि शैक्षणिक गुणवत्तेकडे लक्ष दिल्यामुळे त्यांच्या व व्यवस्थापनाच्या प्रयत्नाने महाविद्यालयास NAAC 'A" ग्रेड प्राप्त झाली. यासर्व शिक्षकांनी मा. शिवाजी विद्यापीठाचे ACADEMIC AUDIT उत्तम त-हेने पार पाडून महाविद्यालयास 'A+' चा दर्जा प्राप्त करून दिला. महाविद्यालय स्वायत्त (ऑटोनॉमस) झाले आहे आणि ते होताना याच तक्रारदार शिक्षकांनी महाविद्यालय स्वायत्त होवू नये याकरिता देखील बरेच प्रयत्न केले आहेत. परंतु ते निष्फळ ठरले आहेत.

७. वर नमूद गैरकृत्यांच्या आधारे तक्रारदार शिक्षकांनी महाविद्यालयाचे न भरून येणारे बरेच नुकसान केले आहे. त्यांच्या या सर्व गैरवर्तणुकी मा. शिवाजी विद्यापीठाच्या स्टॅटयूट नुसार कायदेशीररित्या शिक्षेस पात्र ठरतात. तरी या सर्व तक्रारी फेटाळण्यात याव्यात ही नम्र विनंती.

**समितीची निरिक्षणे :**

सदर महाविद्यालयातील श्री.संदीप प्रभाकर गायकवाड, श्री.विजय जयसिंगराव खोत, श्री.युवराज रामचंद्र पाटील, श्री.महेश विठठल खराडे, श्रीमती. शामला राजाराम महाडिक, श्री.कुलकर्णी प्रसाद रामचंद्र, श्रीमती पुजा प्रसाद बेळगली या सर्व तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारी एकाच स्वरुपाच्या आहेत. सबब तक्रारीमध्ये एक मागणी केलेली असल्यामुळे सर्व तक्रारीमध्ये एकाच कायदयाचा प्रश्न निर्माण झालेला असल्यामुळे सर्व तक्रारीची एकत्र सुनावणी घेण्यात आली व एकत्रित आदेशाने निर्गत लावण्यात येत आहे.

थोडक्यात तक्रारी विषयी हे सर्व तक्रारदार जाबदार महाविद्यालयात त्यांच्या तक्रार अर्जात नमूद केलेल्या पदावर आणि नमूद कालावधीपासून अध्यापनाचे कार्य करतात. त्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ या करिताची वेतनवाढ महाविद्यालयाने दिलेली नाही. दि.२३/०६/२०२३ रोजी नोटीस देवून महाविद्यालयाच्या प्रशासनाने त्यांची वेतनवाढ का रोखू नये याचा खुलासा मागणीचे पत्र दिले आहे. तक्रारदारांच्या कथनानुसार, सदर नोटीसीत नमूद केलेली वस्तुस्थिती चुकीची व दिशाभूल करणारी होती व आहे व त्यानुसार सर्व तक्रारदारांनी मुद्देनिहाय खुलासा महाविद्यालय प्रशासनास दिला असून

वेतनवाढ देण्याबाबत विनंती केली. परंतु त्यांच्या विनंतीचा कोणताही विचार महाविद्यालयाने केला नाही व पूर्वलक्षी प्रभावाने दि.०१/०७/२०२३ रोजीच्या पत्राने वेतनवाढ रोखलेली आहे. सदर पत्रात तक्रारदाराने संस्थाविरोधी कारवाया केल्यामुळे शिवाजी विद्यापीठ परिनियम २११ (३) (II) अन्वये वेतनवाढ रोखण्यात येत असल्याचे कळविले आहे. तक्रारदारांच्या कथनानुसार त्यांनी कोणतीही संस्था विरोधी कारवाई केलेली नाही. तथापि त्यांनी नियमानुसार व पूर्ण वेतन न देण्याची पदावनती करणे याविरूध्द् शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, तंत्र शिक्षण संचलानलय, मुंबई, विभागीय तंत्रशिक्षणालय पुणे, एआयसीटीई यांच्यासारख्या शिखर संस्थांकडे तक्रारी केलेल्या आहेत. याबाबी संस्थाविरोधी कारवाई होत नाहीत. त्यामुळे अशा बेकायदेशीर कारणांवरून त्यांची वेतनवाढ रोखण्याची केलेली कृती ही अन्यायी व अयोग्य आहे. परिनियम २११ नुसार वेतनवाढ रोखायची असेल तर त्याबाबतची प्रक्रिया वेतनवाढ देय होण्याच्या तारखे अगोदर होणे आवश्यक आहे. मात्र अशी कोणतीही प्रक्रिया न करता, एक वर्षापूर्वीची वेतनवाढ रोखणे चूकीची व अयोग्य आहे. सन २०२३-२०२४ ची वेतनवाढ ही, दि.०१/०७/२०२३ रोजीची वेतनवाढ देय असताना देखील ही वेतनवाढ महाविद्यालय व प्रशासनाने त्यांना दिलेली नाही. आणि याप्रमाणे प्रशासनाने अन्याय केलेला आहे. सबब ही कृती रद्द होण्यास पात्र आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ व २०२३-२०२४ यावर्षी देय असणाऱ्या वेतनवाढी देण्याबाबतचे आदेश संस्था व महाविद्यालय व प्रशासनास देण्यात यावी अशी मागणी तक्रारदारांनी केलेली आहे.

युक्तिवादा दरम्यान सर्व तक्रारदार व्यक्तिशः समितीसमोर हजर होते. वारंवार संधी देऊन देखील संस्था आणि महाविद्यालय तर्फे व्यक्तिशः कोणीही हजर झालेले नाही. केवळ अधिकारपत्र देऊन महाविद्यालयाचे प्रबंधक या समितीसमोर हजर होत गेलेले आहेत. वास्तविक या समितीने सुनावणीच्यावेळी संस्थेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी व्यक्तिशः हजर राहावे अशा स्पष्ट सूचना संस्थेला दिलेल्या असताना देखील न पटणारी कारणे देऊन केवळ अधिकारपत्र, ज्यांना व्यक्तिशः माहिती नाही अशा इसमास देऊन या प्रकरणी आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही गोष्ट आक्षेपार्ह आहे. सर्व तक्रारदार हे अध्यापनाचे कार्य करतात आणि शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत असणा-या महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवेत आहेत. ही बाब उभयपक्षी मान्य आहे. त्यांच्या सेवा व शर्ती या शिवाजी विद्यापीठ कायदा १९७४ खाली निर्गमित करण्यात आलेल्या संलग्नित महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील शिक्षकांना लागू असणारे परिनियमास अनुसरुन नियंत्रित आहे व ही बाब उभयपक्षी मान्य आहे. तक्रारदारांनी आपल्या तक्रार अर्जांमध्ये त्यांची सन २०२२-२३ ची वेतनवाढ दि.०१ जुलै २०२२ रोजी देय होती. परंतू गेले वर्षभर महाविद्यालय प्रशासनाने वेतनवाढ दिली नाही. दि.२३ जून २०२३ रोजी प्रशासनाने सन २०२२-२३ ची

वेतनवाढ का रोखू नये याचा खुलासा विचारला आहे. याबाबत समितीचे मत असे की, वेतनवाढ ही पूर्वलक्षी दिली जात नाही. सन २०२२-२३ मध्ये घडलेल्या कृतीवर नाराज होवून संस्थेने दि.२३/०६/२०२३ रोजी कारवाई केली आहे व दि.०१/०७/२०२३ रोजी २०२२-२३ रोजीची वेतनवाढ रोखली आहे. सबब संस्थेने चुकीच्या पध्दतीने वेतनवाढ रोखल्याचे तक्रारदार यांच्या म्हणण्यात तथ्य दिसून येत नाही.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये संस्थेविरूध्द् कोणती कृत्ये केलेली आहेत हे नमूद केलेली आहेत. त्यांनी संस्थेविरुध्द् नियमानुसार व पूर्ण वेतन न येणे, पदावनती करणे या विरोधी विद्यापीठ व मा.उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, मा. विभागीय सहसंचालक, शिक्षण, पुणे, ए.आय.सी.टी.ई. या शिक्षण संस्थेंकडे तक्रारी केलेल्या आहेत ही बाब मान्य केलेली आहे. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे या बाबी संस्थेविरोधी कारवाया होऊ शकत नाहीत. या कारणांमुळे महाविद्यालयाने त्यांची वेतनवाढ रोखलेली आहे ही बाब महाविद्यालयाने मान्य केलेली आहे. शिवाजी विद्यापीठ कायदा, १९७४ खाली निर्गमित करण्यात आलेल्या संलग्नित महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील परिनियम क्र. २११ हा अध्यापकांच्या सेवेतील अटी व शर्ती नमूद करतो. त्यातील उपकलम २ हे आचारसंहिता ठरवते, उपकलम ३ अध्यापकांस देऊ शकल्या जाणा-या शिक्षा नमूद करते. तर कलम २१२ दिल्या जावू शकणा-या शिक्षांबद्दलची पध्दत आणि त्यांचे स्वरुप स्पष्ट करते. कलम २११ (३) (II) मध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, गैरवर्तनाकरिता एखाद्या अध्यापका विरूध्द् खातेनिहाय कारवाई केली जाऊ शकते. त्या उपकलमा खालील स्पष्टीकरणात गैरवर्तन म्हणजे काय याची व्याख्या करण्यात आलेली आहे आणि त्या व्याख्येत असे नमूद केले आहे की, गैरवर्तन म्हणजे त्यात नमूद केलेल्या पाच गोष्टींशिवाय इतरही अनेक कृत्ये हे गैरवर्तन होऊ शकते. इतर कोणतीही कृत्ये हे त्यात स्पष्टपणे नमूद केलेली नाहीत. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, अध्यापकाचे एखादे वर्तन जे संस्था विरोधी असेल तर ते गैरवर्तन या सदराखाली मोडले जाऊ शकते. एखाद्या संस्थेविरुध्द् वारंवार तक्रारी करणे हे संस्थेच्या दृष्टीने अध्यापकाचे गैरवर्तन ठरु शकते आणि असे गैरवर्तन शिक्षेस पात्र होऊ शकते. आणि हे गैरवर्तन कलम २१२ उपकलम (१) खाली किरकोळ शिक्षा या शिक्षेला पात्र होऊ शकते. किरकोळ शिक्षा म्हणजे ज्याचा सेवेवर काहीही परिणाम होत नाही आणि त्या किरकोळ शिक्षेचे एक स्वरूप म्हणजे तत्कालीन वेतनवाढ रोख हे स्वरूप आहे. प्रस्तुत प्रकरणी या सर्व तक्रारदारांची एका वर्षाची वेतनवाढ रोखलेली आहे. तत्कालीन वेतनवाढ रोखण्याचा परिणाम पुढील वाढीवरती होत नाही. या सर्व तक्रारदारांची पुढच्या वेतनवाढींवर त्याचा परिणाम होणार नाही. अशी किरकोळ शिक्षा एखादया कर्मचा-यावरती बसविण्याकरिता आवश्यक असणारी जी प्रक्रिया आहे ती प्रकिया केवळ त्याला नोटीस देऊन त्याचे

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

स्पष्टीकरण घेऊन शिक्षा ठोठावण्याची प्रक्रिया आहे. विस्तृतपणे चौकशी करुन, संधी देऊन म्हणणे मांडणे व त्यावरील साक्षीदार तपासणेची ही प्रक्रिया राबविणे, त्यास कडक शिक्षा जेव्हा अपेक्षित असते, त्या वेळेला अवलंबण्याची प्रक्रिया असते. दि.०१.०७.२०२३ च्या पत्रान्वये जाबदारांनी तक्रारदारांची केवळ एकच वर्षाची वेतनवाढ रोखलेली आहे, असे त्यांच्या पत्रामध्ये स्पष्ट नमूद आहे. सबब संस्थेस परिनियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे तक्रारदार यांचेवर ठोठावण्यात आलेली किरकोळ स्वरुपाची शिक्षा ही या समितीने हस्तक्षेप करण्यासारखी नाही असे या समितीचे मत आहे. सबब या तक्रारदारांच्या सर्व तक्रार अर्जांमध्ये काही अर्थ नाही असे या समितीचे मत आहे आणि या सर्व तक्रारी खारीज करण्यास पात्र आहेत असे या समितीचे मत आहे. सबब समिती खालील एकत्रित आदेश पारित करीत आहे.

## आदेश

तक्रारदार अर्ज कं.२५/२०२३, २६/२०२३, २७/२०२३, २८/२०२३, २९/२०२३, ३०/२०२३, ३१/२०२३ खारिज करण्यात येत आहे.

आदेशाची मूळ प्रत तक्रार अर्ज क्र.२५/२०२३ मध्ये ठेवण्यात यावी व त्याची प्रत तक्रार अर्ज कं. २६/२०२३ ते ३१/२०२३ मध्ये ठेवण्यात यावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देवून तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 2 6 MAR 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)